**कर्मचारीवर्ग खाते**
परिपत्रक क्र. १२/९४

क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/३६९५.
म.रा.मा.प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८. दिनांक : २२.७.१९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा.प. मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर./ अमरावती/ नाशिक.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

व्यवस्थापक (प्रशिक्षण),
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

मुख्य सल्लागार,
संस्थांतर्गत व्यवस्थापन सल्ला गट,
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक,
रा.प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई/धुळे/जळगांव/नाशिक/पालघर/
रायगड(पेण)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/कोल्हापूर/सांगली/
सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
परभणी/नागपूर/अकोला/अमरावती/भंडारा/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ.

कार्यकारी अभियंता,
रा.प. औरंगाबाद/धुळे/कोल्हापूर/नागपूर/पुणे/परभणी/ठाणे/अकोला/बारामती.

विषय : मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूकीबाबत.

संदर्भ : सामान्य स्थायी आदेश क्र. २००७,
दिनांक २१.७.१९७१.

...

आपले लक्ष संदर्भित सामान्य स्थायी आदेशाकडे वेधण्यात येते. सदर सामान्य स्थायी आदेशामध्ये, मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक २ (दोन) वर्षांसाठी करावी परंतु ती पुनर्नेमणूकीच्या अधीन राहील, असे विहित करण्यात आले आहे. तथापि या तरतुदीचे पालन एकरुपपणे केले जात नाही असे निदर्शनास आलेले आहे. परिणामी कालांतराने अशा प्रकरणी अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होऊ शकतात, हे ध्यानात ठेवणे गरजेचे आहे. म्हणून आपणांस पुन्हा एकदा सुचित करण्यात येते की, उपरोक्त सामान्य स्थायी आदेशामधील दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व त्यानुसार मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांस नेमणूकीचे आदेश देतांना त्यांत दोन वर्षांच्या कालावधीचा ठळकपणे उल्लेख करावा.

तसेच मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या बाबत तक्रारी आल्यास व त्यामध्ये तथ्य असल्याचे शहानिशा केल्यानंतर आढळून आल्यास सामान्य स्थायी आदेशामध्ये दिलेल्या सूचनांनुसार मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूकीच्या संदर्भात पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सोबत - सा.स्था.आ.२००७ ची
प्रत.

(सही) २२.७.९४
उप महा व्यवस्थापक (क.व औ.सं.)

का १६७९४